# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd. 1962
NAAC 'A' Grade

## परिपत्रक

**(विधी अभ्यासक्रमास (अंतिम वर्ष/अंतिम सत्र वगळून) प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्यासाठी)**

बीसीआयच्या (Bar Council of India) दिनांक 01/11/2020 च्या निवेदनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार विधी अभ्यासक्रमास प्रवेशित उन्हाळी 2020 मधील परीक्षेसाठी विहित प्रकियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व सत्राच्या (अंतिम सत्र/अंतिम वर्ष परीक्षा वगळून) परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार विधी अभ्यासक्रमामधील सर्व सत्राच्या (अंतिम वर्ष/अंतिम सत्र वगळून) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. वरील अभ्यासक्रमाच्या (अंतिम सत्र/अंतिम वर्ष परीक्षा वगळून) विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. 15 डिसेंबर, 2020 ते 31 डिसेंबर, 2020 या कालावधीमध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर सुयोग्य (Online/Offline) पध्दतीने होतील. (परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.)
2. वरील अभ्यासक्रमाच्या (अंतिम सत्र/अंतिम वर्ष परीक्षा वगळून) विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षा 50 गुणांची (30 प्रश्नापैकी 25 प्रत्येकी 02 गुण), 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर होईल.
3. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप खालीलप्रमाणे असून प्रत्येक प्रश्नाच्या खाली/समोर उत्तरासाठी जागा ठेवण्यात येईल.

   उदा. – प्रश्न ........................................................................................................ | योग्य पर्याय |

   A) -------------- B)-------------- C) -------------- D) --------------
4. उत्तरासाठी √ (टिकमार्क) न करता चौकटीमध्ये उत्तर लिहीण्यात यावे (उदा. A, B, C, D इत्यादी )
5. विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येईल.
6. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेत येईल.
7. कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल/सूचना सोबत जोडलेल्या असून त्यानुसार योग्य ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/३७५
दिनांकः– 25 नोव्हेंबर, 2020
प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख विधी अधिविभाग
2. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित विधी महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र